क्र.मबाविआ/बावि/बागृ/१४-१५/का.५/ ४८०६
महिला व बालविकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, २८ राणीचा बाग,
जुन्या सर्किट हाऊस जवळ, पुणे १.
दिनांक : ___ .७.२०१४ ३१/७

प्रति,
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,**
**(सर्व )**

**विषय :- राज्यातील विभागाअंतर्गत कार्यरत शासकिय/स्वंयसेवी संस्थाचे अधिक्षक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), जिल्हा परिविक्षा अधिकारी यांना “ विपश्यना ” साधना शिकणेबाबत.**

संदर्भ :- १. महिला व बाल विकास विभाग , शासन परिपत्रक क्र.संकिर्ण - २०११/प्र.क्र.३५२/का-८ दिनांक १२ ऑक्टोबर, २०११.
२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्र.-संकिर्ण २०११(२९६/११) माशि- ३, दिनांक २७ जानेवारी, २०१२.
३. आयुक्तालयाचे पत्र क्र.३०३१ दिनांक १९.५.२०१४

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येत की, राज्यात सर्व प्रकारच्या अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना “ विपश्यना ” या ध्यानसाधनेच्या दहा दिवसाच्या शिबीरात भाग घेण्याची सवलत अगोदरच शासनाने दिलेली आहे. ही शिबीरे मनाच्या एकाग्रतेद्वारे विचार व आचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी लाभदायी ठरल्याचे निदर्शनास आलेले आहे. यास्तव विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच संस्थांचे अधिक्षक यांना सदर शिबीरात सहभागी हाण्यासाठी विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूट, धम्मगिरी, इगतपुरी, जि.नाशिक या संस्थेमार्फत राज्यातील विविध ठिकाणच्या “ विपश्यना ” केंद्रामध्ये ठराविक जागा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यानूसार जागेच्या उपलब्धतेनुसार आयुक्तालयामार्फत अधिकारी/कर्मचारी यांची नावे संबधित “ विपश्यना ” केंद्रास व आपणांस सदरच्या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहने बाबत आदेश काढण्यात आलेले आहे.

तथापि आयुक्तालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, विपश्यना केंद्रामध्ये अधिकारी /कर्मचारी व संस्थांचे अधिक्षक प्रशिक्षणास उपस्थित राहत नाहीत तसेच विपश्यना केंद्रतील कर्मचाऱ्यांशी वाद घालतात ही बाब विभागाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.

यास्तव आपणास कळविण्यात येते की, आपल्या जिल्हयातील प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या नावाचीच व्यक्ती प्रशिक्षणासाठी हजर राहतील या बाबत दक्षता घ्यावी तसेच ज्या व्यक्तीची प्रशिक्षणासाठी निवड झालेली आहे. त्याना रितसर प्रशिक्षणाचे आदेश वेळेवर द्यावेत व प्रशिक्षणाची सविस्तर माहिती आधी देऊन त्यांची लेखी संमती घ्यावी ज्यांनी संमती दिलेली आहे त्यांनाच प्रशिक्षणसाठी जाण्याचे आदेश द्यावेत व तसे विपश्यना केंद्रास प्रशिक्षणा आधी तशी यादी कळवावी म्हणजे विपश्यना केंद्रास नियोजनाची गैरसोय होणार नाही. तसेच प्रशिक्षणार्थीना विपश्यना केंद्राच्या नियमाचे व शिस्तीचे पालन करून शिस्तींचा भंग होणार नाही याची प्रत्येक प्रशिक्षणार्थीनी दक्षता घ्यावी. तसेच प्रशिक्षासाठी कोण कोण उपस्थित झालेले आहेत त्याचीही माहिती प्राप्त करून आयुक्तालयास सादर करावी.

स्थळ प्रतिवर मा. आयुक्त
यांची स्वाक्षरी असे

**आयुक्त**
**महिला व बालविकास,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे करिता**

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव**

१. विभागीय उप आयुक्त महिला व बाल विकास मुंबई विभाग,पुणे विभाग, नाशिक विभाग, औरंगाबाद विभाग, अमरावती विभाग, नागपूर विभाग. यांना सूचित करण्यात येतें की, आपण या प्रकरणी व्यक्तीशः लक्ष घालून सदरचे प्रशिक्षण कार्यक्रमव्यवस्थीत पार पाडण्यासाठी पुढील कार्यवाही करावी.